सामना पा.नं.१.

## 'सॅफ्रन'ने ११८५ कोटींसह हैदराबाद गाठले

# आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला!

**नागपूर, दि. ३० ( प्रतिनिधी ) - खोके सरकारमुळे महाराष्ट्राच्या मागे साडेसाती लागली असून टाटा एअरबस प्रकल्पानंतर नागपूरमध्ये होणारा एक हजार कोटींचा सॅफ्रन प्रकल्पही महाराष्ट्राबाहेर गेला आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या हातून निसटल्याने ६०० नोकऱ्याही गमवाव्या लागल्या आहेत. दरम्यान, मिंधे आणि कमळाबाईच्या घटनाबाह्य हातमिळवणीनंतर महाराष्ट्राने तीन महिन्यांत पाच मोठे प्रकल्प गमावले असून जनतेतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

▮ पान ८




### प्रकल्प नेमका कसा आहे?

हिंदुस्थानी आणि परदेशी व्यावसायिक विमान कंपन्या लिप-१ ए आणि लिप-१ बी या प्रकारची इंजिने वापरतात. त्यांची देखभाल आणि दुरुस्ती या एमआरओमध्ये होणार आहे. या प्रकल्पासाठी १ हजार १८५ कोटींची थेट परदेशी गुंतवणूक आहे. या एमआरओमुळे प्रत्यक्ष ५००-६०० उच्च कुशल रोजगार निर्माण होणार आहेत. पहिल्या टप्प्यात या एमआरओमध्ये वर्षाकाठी २५० इंजिन्सची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची सुविधा राहील.

### टाटा-एअरबस प्रकल्पाचे भूमिपूजनही झाले

टाटा एअरबस प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याने महाराष्ट्रात संतापाचे वातावरण असतानाच रविवारी या प्रकल्पाचे वडोदरा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते भूमिपूजनही झाले. गुजरात निवडणुकीसाठी भाजपने केलेली ही बेगमी असल्याचे आता यामुळे उघड झाले आहे. या प्रकल्पात हिंदुस्थानी वायुसेनेसाठी सी २९५ विमाने तयार केली जाणार आहेत. एअरबस ही युरोपियन एअरोस्पेस कंपनी आणि टाटा समूह यांचा हा संयुक्त प्रकल्प आहे.



### राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळेच महाराष्ट्राची हार!



कृषी आणि उद्योग या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांचा खोके सरकारवरील विश्वास उडाला आहे. गुंतवणूकदारांना महाराष्ट्रातील राजकीय स्थिरतेची खात्री नाही तर नैसर्गिक आपत्तीवेळी सरकारकडून मदत मिळेल याची बळीराजाला शाश्वती उरलेली नाही, असे नमूद करतानाच राक्षसी महत्त्वाकांक्षा + पूर्णपणे कोलमडलेले प्रशासन यामुळेच महाराष्ट्राची हार असे चित्र असल्याचे खरमरीत ट्विट शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी सॅफ्रन प्रकल्प महाराष्ट्राच्या हातून निसटल्यानंतर केले.

### प्रकल्प का गेले? मुख्यमंत्र्यांनीच उत्तर द्यावे



अशा वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवायला हवी. चार ते पाच प्रकल्प दुसऱ्या राज्यांत गेले आहेत. महाराष्ट्रातून हे प्रकल्प नेमके का गेले, याचा अभ्यास व्हायला हवा. प्रकल्प राज्याबाहेर का गेले? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यायला हवे, अशी मागणी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

पुढारी ५-११-२.

# रिक्षात विसरलेली बॅग प्रवाशाला केली परत

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील **खानिवडे** टोलनाका येथे थांबलेल्या **लक्झरी** बसमध्ये जाण्यासाठी विरार **फाटा** येथून रिक्षा भाड्याने केली. **यावेळी** बस पकडताना गडबडीत रोख **रक्कम** आणि कपडे असलेली एक बॅग **रिक्षातच** राहिली. ती बॅग मूळ मालकाला पोलिसांनी मिळवून दिली.

दिवाळीनिमित्त हिमत मोहन **सिंग** हे गुजरातच्या दिशेने जाण्यासाठी **महामार्गावरील** विरार फाटा येथे खासगी **बसची** वाट पाहत होते. २६ ऑक्टोबर **रोजी** दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास **मुंबईहून** येणारी बस ही विरार फाटा येथील उड्डाण पुलावरून निघून गेल्याने बसमध्ये बसण्यासाठी ते रिक्षात बसून खानिवडे टोल नाक्यावर गेले. यावेळी घाईघाईत रिक्षातून इतर बॅग बसमध्ये नेत असताना एक बॅग ही रिक्षातच राहिली. याबाबत हिम्मत सिंग यांनी बॅग हरवल्याची तक्रार मांडवी पोलीस ठाण्यात दिली होती. मांडवी पोलिसांनी परिसरातील रिक्षा युनियन संघटनांना माहिती देऊन या घटनेचा तपास सुरू केला. शिरसाड फाटा रिक्षा युनियनचे अध्यक्ष हरिश्चंद्र गायकवाड यांनीही याकामी सहकार्य केले. पोलिसांना मिळालेले सीसीटीव्ही फुटेज व रिक्षा चालकांच्या मदतीने संजय अनुसय यांची रिक्षा असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी प्रफुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी रिक्षात सापडलेल्या बॅगचे मालक, मनसे कार्यकर्ते हिंमत सिंग यांना देण्यात आली.



**प्रवाशाला बॅग परत करताना पोलीस अधिकारी व अंमलदार**

पुढारी ५-११-२०

# वसईची कोंडी सुटण्यासाठी १२ उड्डाणपुलांचा प्रस्ताव

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई- विरार शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी वसई विरार महापालिकेने ४ रेल्वे उड्डाणपूल आणि रस्त्यावरी १२ उड्डाणपुलांचा प्रस्ताव नव्याने एमएमआरडीएकडे सादर केला आहे. रेल्वे उड्डाणपुलांना तातडीने मंजुरी मिळावी यासाठी पालिकेने पाठपुरावा सुरू केला आहे. त्यामुळे शहरातील पूर्व आणि पश्चिमेकडील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी ५० टक्क्यांनी कमी होईल, असा विश्वास पालिकेने व्यक्त केला.

वसई-विरार शहरात झपाट्याने नागरीकरण होत आहे. नवनवीन वसाहती विकसित होत आहेत. वसई विरार शहराचे क्षेत्रफळ ३८० चौरस किलोमीटर एवढे आहे. शहराची लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. शहरातील रस्ते अरुंद असून त्यावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सर्वाधिक वाहतूक कोंडी ही शहराच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी होत असते. त्यासाठी रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) बांधण्याची संकल्पना समोर आली होती. त्यानुसार नायगाव पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल तयार करण्यात आला असून विरारमधील नारिंगी येथे रेल्वे उड्डाणपूल तयार करण्यात येत आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. अन्य भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पालिकेने शहरात ४ रेल्वे उड्डाणपुलांचा प्रस्ताव तयार केला आहे.

पुढारी ५-११-२.

# वेश्याव्यवसायासाठी मुली पुरवणाऱ्या महिलेला अटक

**मिरा रोड :** काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने वेश्याव्यवसायासाठी मुली पुरवणाऱ्या महिला दलालाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षचे पोलीस निरीक्षक देविदास हंडोरे यांना माहिती मिळाली की काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ठाकूर मॉल समोर, अजित पॅलेस हॉटेलजवळ, एक महिला दलाल वेश्याव्यवसायासाठी मुली घेऊन येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने अजित पॅलेस हॉटेल, पेणकर पाडा येथे सापळा रचून छापा टाकला. पोलिसांच्या छाप्यात १ महिलेच्या तावडीतून २ पीडित मुलींची वेश्याव्यवसायाच्या सुटका केली. ही महिला दलाल अनेक महिन्यांपासून वेश्याव्यवसायाचा गोरख धंदा चालवत होती. या सेक्स रॅकेटचा मास्टर माईंड फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पुढारी ५-५-२०.

# पोलीस गस्तीच्या बळकटीकरणासाठी क्यूआर कोड प्रणाली

## वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाचा उपक्रम ; नागरिकांना फायदा

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

पोलीस गस्तीच्या बळकटीकरणासाठी आता वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाने विशेष क्यूआर कोडची संगणक प्रणाली कार्यान्वित केली आहे. त्यामुळे संकटकाळात नागरिकांना निश्चितच फायदा होणार आहे.

शहरातील गस्तीवरील पोलीस कुठे गस्त घालतात? ते नेमून दिलेल्या जागेवर गस्त घालतात की नाही? याची अचूक नोंद ठेवणारी क्यू आर यंत्रणा वसई, विरार शहरातील पोलीस ठाण्यात लागू करण्यात आली आहे. यामुळे शहरातील गस्तीवरील पोलीस नेमक्या कुठल्या ठिकाणी आहे त्याची माहिती नियंत्रण कक्षाला मिळून नागरिकांना संकटकाळी तात्काळ मदत मिळणे शक्य झाले आहे.

शहरात कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहरात पोलीस गस्त घालण्यात येत असते. ही गस्त घालण्याचे काम बीट मार्शल करत असतात. बीट मार्शलना कुठे गस्त घालायची तो परिसर नियुक्त केलेला असतो. त्या परिसरातील महत्त्वाची आणि संवेदनशील ठिकाणांवर ते गस्त घालत असतात. परंतु ते नेमकी कशी गस्त घालतात? त्या ठिकाणी पोहोचतात का? याची निश्चित माहिती वरिष्ठांना नसते. शहरातील पोलीस गस्त अधिक परिपूर्ण व्हावी, नागरिकांना भयमुक्त वातावरण मिळावे यासाठी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने विशेष सॉफ्टवेअर विकसित केले आहे.

नागपूर आणि कर्नाटक राज्याच्या धर्तीवर हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. यामध्ये गस्तीवरील पोलिसांच्या मोबाइलमध्ये हे क्यूआर कोड सॉफ्टवेअर असणार आहे.

शहरात कुठल्या भागात कुठला पोलीस आहे याची माहिती या क्यूआर कोड संगणक प्रणालीमुळे पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षात मिळत राहणार आहे. नागरिकांनी संकटकाळी मदतीसाठी ११२ क्रमांकावर कॉल केल्यास त्या भागातील बीट मार्शलला संबंधित ठिकाणी तात्काळ पाठवला जाणार आहे. याशिवाय आपल्या परिसरात कोणता पोलीस गस्तीवर आहे याची माहिती परिसरातील नागरिकांना एसएमएसद्वारे मिळत जाणार आहे. अगदी पोलिसाचे नाव, मोबाइल क्रमांक आदींची माहिती नागरिकांना मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनादेखील या पोलिसांना संपर्क करणे सोपे होणार आहे.

प्रायोगिक तत्त्वावर विरार, तुळींज आणि माणिकपूर या पोलीस ठाण्यात ही यंत्रणा राबविण्यात आल्यानंतर ती वसई आणि विरार शहरातील सर्व दहा पोलीस ठाण्यात सुरू करण्यात आली आहे. लवकरच ती मीरा भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यात सुरू केली जाणार आहे. पालघर जिल्ह्यात वाढलेल्या गुन्हेगारीला यामुळे आळा बसणार आहे. वसई-विरार, नालासोपारा शहरांमध्ये सध्या चेन स्नॅचिंग, बंद घरे फोडून चोऱ्या, दरोडे अशा अनेक घटना घडत असतात. त्याचबरोबर महिलांवरील अत्याचारांमध्येही वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या गस्ती वाढवण्यात आलेल्या आहेत. मात्र पोलीस कर्मचारी दिलेल्या जागी, त्या-त्या बिटमध्ये गस्त घालतात का? याबाबत वरिष्ठांनाही माहिती मिळणार आहे.

### नियंत्रण कक्षात माहिती उपलब्ध होणार; संकटकाळात मोठी मदत



प्रत्येक पोलीस ठाण्याच्या गस्तीवरील पोलिसांना (बीट मार्शल) दैनंदिन गस्त घालण्याची ठिकाणे (पॉइंट) नेमून दिलेले असतात. ज्यात गर्दीची ठिकाणी, बँका, शाळा महाविद्यालय परिसर, निर्जन स्थळे, धार्मिक स्थळे, प्रमुख नाके आदींचा समावेश असतो. बीट मार्शल या ठिकाणी गेल्यावर त्यांना आपल्या मोबाईलमधून क्यू आर कोड स्कॅन करावा लागतो. तो स्कॅन झाला की नियंत्रण कक्षात संबंधित ठिकाणी (पॉइंटवर) कोण पोलीस आहे याची माहिती मिळते. कुठल्या भागात कुठला पोलीस गस्तीवर आहे त्याची माहिती वरिष्ठांना मिळते. संबंधित पोलिसांनी सर्व ठिकाणी कुठल्या मार्गाने गस्त घातली याची संपूर्ण माहिती मिळणार आहे.

पुढारी पा.नं.३.

# नालासोपाऱ्यात अनधिकृत मार्केटला तिसऱ्यांदा आग

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**



नालासोपारा पूर्वेकडील रेल्वे स्थानकाच्या तिकीट खिडकीच्या पाठीमागे अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या जाधव मार्केटमधील मोबाईल दुरुस्तीच्या दुकानाला काल भीषण आग लागली. या दुर्घटनेत मार्केटमधील सात ते आठ दुकानांनी पेट घेतला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेवून आगीवर नियंत्रण मिळवले. हि आग शॉर्ट सर्किट ने लागून दुकानाच्या मागील गाळ्यात ठेवण्यात आलेले फाटके आणि कपड्या मुळे आगीने रौद्ररूप धारण केले होते.

गर्दीने गजबजलेल हे नालासोपारा रेल्वे स्टेशन च्या परिसरात पत्र्यांनी बनवलेल्या गाळ्यामध्ये मोबाईल आणि कपड्यांची दुकाने थाटली असून त्यामध्ये सुरक्षेच्या नियमांची पायमल्ली करून पालिकेच्या नाकावर टिच्चून हे जाधव मार्केट उभ केल आहे. यापूर्वी या जाधव मार्केट ला २ वेळा आग लागल्याची घटना घडली होती. त्यावेळी पालिकेने त्यावर थातूर मातुर कारवाई केली होती. या जाधव मार्केट ऐन गर्दीच्या वेळी ही आग लागल्याने मोठी घबराट पसरली. स्टेशनकडे जाणारा रस्ता रिक्षा चालकांनी व्यापला होता. त्यामुळे अग्निशमनदलाची गाडी घटना स्थळी पोहचण्यास उशीर होत होता. अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्त्यावर उतरून वाहतूककोंडी दूर केली. दुसऱ्या बाजूने स्टेशन परिसरात जाणारा रस्ता लोखंडी खांब पुरल्याने आगीच्या ठिकाणी पोहोचणे मुश्कील झाले होते. मात्र त्यावर लीडिंग फायरमन रुपेश पाटील, कुणाल तामोरे व इतर अग्निशमन जवानांनी प्रसंगावधान राखून जीवाची पर्वा न करता आग विझवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. या जाधव मार्केट ला लागून एक खासगी शाळा आहे. काल शनिवार असल्याने शाळा बंद होती ही आग जर सकाळच्या वेळेत लागली असती तर मोठी जीवितहानी झाली असती.

लोकमत ५.५१.१.

# छठपूजेनिमित्त लावलेले राजकीय बॅनर उतरवले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईदर पश्चिमला मोठ्या प्रमाणात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य काही लोकांनी छटपूजेसाठी लावलेले बेकायदा बॅनर तक्रारीनंतर रविवारी पालिकेने काढून टाकले, तर बेकायदा बॅनरबाज राजकारण्यांवर गुन्हे दाखल करून बॅनर काढण्यासाठीचा खर्च व दंडवसुली करण्याची मागणी जागरूक नागरिकांनी केली आहे.

भाईदर पश्चिमेला सार्वजनिक ठिकाणी, झाडांवर, विजेचे खांबावर हे बॅनर लावले होते. या प्रकरणाची तक्रार थेट पोलीस नियंत्रण कक्ष व भाईदर पोलिसांना तसेच पालिकेपर्यंत झाली. काही वेळातच पालिकेचे कनिष्ठ अभियंता व पथकाने भाईदर पश्चिम खाडीकिनारा, मासळी मार्केट व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग व परिसरातील बेकायदा बॅनर काढले.

सकाळ पु. पा. ४०

# कळंबमध्ये समुद्रात अडकलेली कार सुखरूप बाहेर

नालासोपारा, ता. ३० (बातमीदार) : हौशी पर्यटकांच्या कार समुद्रकिनाऱ्यावर अडकत असल्याच्या घटना वाढत आहेत. चार दिवसांपूर्वी वसईच्या भुईगाव समुद्रकिनाऱ्यावर एक कार २४ तास समुद्रात अडकल्याची घटना ताजीच असताना रविवारी कळंब समुद्रकिनाऱ्यावर एक कार पुन्हा समुद्रात अडकली होती; पण भरतीच्या पाण्याचा अंदाज येताच जीवरक्षक, स्थानिक नागरिक यांनी तत्काळ कारला धक्का मारून बाहेर काढल्याने पुढील अनर्थ टळला आहे.

ठाणे, मुंबई जिल्ह्यातील पर्यटक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी अर्नाळा, कळंब, राजोडी, भुईगाव या समुद्रकिनाऱ्यावर येतात. येथे पर्यटनाचा आनंद घेण्याऐवजी काही हौशी पर्यटक आपली कार समुद्राच्या किनाऱ्यावरून फिरविण्याच्या आनंद घेण्याचा प्रयत्न करतात; पण अचानक भरतीचे पाणी वाढले की, कार रेतीत अडकून पडते. वसई पश्चिमेकडील भुईगांव समुद्रकिनाऱ्यावर एक कार समुद्रात चार दिवसांपूर्वी २४ तास अडकली होती. शेवटी ओहोटी सुरू झाल्यावर कार बाहेर काढण्यात आली. ही घटना ताजीच असताना रविवारी कळंब समुद्रकिनाऱ्यावर एका पर्यटकाची कार समुद्रात अडकली; पण जीवरक्षक, स्थानिक नागरिकांनी धक्का मारून कार बाहेर काढली.

**पर्यटकांना आवाहन**

**पर्यटकांनी आपली वाहने समुद्रकिनारी नेऊ नयेत, असे आवाहन प्रशासनाकडून वेळोवेळी करण्यात येते. मात्र पर्यटकांच्या अतिउत्साहीपणामुळे अशा घटना या ठिकाणी वारंवार घडत असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर फिरताना कोणतीही जीवघेणी स्टंटबाजी न करता निसर्गाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.**



नालासोपारा : कळंब येथील समुद्रकिनाऱ्यावर अडकलेली कार जीवरक्षक, स्थानिक नागरिकांनी धक्का मारून बाहेर काढली.

पुण्यनगरी पु. पा. १.

# पोलीस आयुक्तालयात विधी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणार

**मीरा रोड** : मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत, तरी येथे विधी अधिकारी नसल्यामुळे कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे पोलीस आयुक्तालयात विधी अधिकाऱ्यांची लवकरच नियुक्ती करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्तालयात कायदेशीर सहाय्यासाठी विधी अधिकारी नसल्यामुळे अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी कायदेशीर सहाय्यासाठी कायदा अधिकारी म्हणून दोन पदे निर्माण केली असून, या पदावर लवकरच विधी अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत.

आयुक्तालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही दोन्ही पदे सध्या कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आहेत. यात अर्जदाराला ६० वर्षे वयोमर्यादा आणि ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे, तर २० हजार वेतनश्रेणी देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे अनेक प्रकरणांमध्ये पोलिसांना बरीच कसरत करून आरोपींना पकडण्यात यश येत असले तरी अनेकदा आरोपी कायदेशीर पूर्तता न झाल्याने सुटतात. त्यामुळे विधी अधिकारी असेल तर पोलिसांना मोठी मदत होणार आहे.

# धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजकावर गुन्हा

**मीरा रोड** : येथील शीतलनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी शुक्रवारी रात्री धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अश्लील नृत्ये केल्याप्रकरणी आयोजकावर मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शीतलनगर परिसरात शुक्रवारी सार्वजनिक रस्त्यावर स्टेज बांधून धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्टेजवर रात्री उशिरापर्यंत नाच-गाण्याचा कार्यक्रम सुरू असल्याच्या तक्रारी दक्ष नागरिकांनी केल्या.

त्यानंतर मीरा रोड पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक हनीफ शेख व हवालदार बालाजी हरणे घटनास्थळी दाखल झाले. त्या वेळी पूजा व भंडाऱ्याचा कार्यक्रम सुरू असल्याचे स्टेजवर फलक लावण्यात आले होते. चित्रपटातील गाण्यांवर दोन तरुणी अश्लील हावभाव करून नाचत असल्याचे दिसून आले. तसेच लाऊडस्पीकरमधून उच्च डेसिबलच्या आवाज येत होता. हा कार्यक्रम पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. या वेळी पोलिसांनी कार्यक्रम थांबवून आयोजकाला ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात कलम २९४ (अश्लील कृत्ये आणि गाणी) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म.टा. पा.नं. २.

# शहरात सक्ती नको

## सहप्रवाशांच्या सीटबेल्टसक्तीवरून वाहतूक तज्ज्ञांचे स्पष्ट मत

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

राज्यात सर्वाधिक रस्ते अपघात महामार्गांवर होतात. तरीही महामार्गांवर चालकाला आणि सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती या नियमाची अंमलबजावणी झालेली नाही. उलटपक्षी, मुंबईत सुरू असलेली विकासकामे, रस्त्यांवरील खड्डे, अतिप्रचंड वाहतूक कोंडी यांमुळे चारचाकी वाहनांचा वेग मंदावलेला आहे. अशात सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती म्हणजे 'आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी' असा हा प्रकार आहे. यामुळे शहरात सहप्रवाशांना सीटबेल्टची सक्ती नको, असे स्पष्ट मत वाहतूक तज्ज्ञांनी मांडले आहे.

उद्या, १ नोव्हेंबरपासून चारचाकी वाहनातील चालक आणि सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती लागू करण्यात येणार आहे. शहरातील वाहनधारकांकडून याला कडाडून विरोध होत असताना शहरातील वाहतूक तज्ज्ञांचीदेखील चालकांना साथ लाभली आहे. राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर वाहने १०० ते १२० किमी या वेगाने धावतात. या वाहनांमधील सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती केलेली नाही. महामार्गांवर सीटबेल्ट नसल्यास

- खड्डे, वाहतूक कोंडी यामुळे मुंबई शहरात वाहनांचा वेग मंदावलेला
- सर्वाधिक रस्ते अपघात होत असल्याने महामार्गांवर सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती आवश्यक
- नवीन नियमांची अंमलबजावणी करताना यंत्रणांनी सुस्पष्ट आदेश द्यावे

चालकांना याबाबत माहिती देणारी यंत्रणा अस्तित्वात नाही. विशेष म्हणजे, सर्वाधिक रस्ते अपघात हे महामार्गांवरच होतात. शहरात मेट्रो आणि अन्य विकासकामे सुरू आहेत. रस्त्यावर खड्डे आहेत. वाहन कोंडीमुळे रस्त्यांवरील वाहनांचा वेग प्रचंड मंदावलेला आहे. यामुळे चारचाकी वाहनांमधील सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती हा नियम राज्य, राष्ट्रीय आणि द्रुतगती महामार्ग येथे लागू करावा. शहरात हा नियम लागू करू नये, असे ज्येष्ठ वाहतूक तज्ज्ञ ए. व्ही. शेणॉय यांनी सांगितले.

प्रवासी सुरक्षेला प्राधान्य द्यायला हवेच. त्यात कोणतीही तडजोड नाही. महामार्गांवर सर्व प्रथम सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती करणे गरजेचे आहे.



> **“ प्रतिष्ठित उद्योगपतीचा मृत्यू झाल्यानंतर मुंबईत सहप्रवाशांना सीटबेल्टसक्ती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वसामान्य प्रवाशांचा अनेकदा अपघात होतो. त्यानंतर कधीही असे नियम किंवा निर्णय घेतले जात नाहीत. यामुळे सर्वसामान्यांचा जीव महत्त्वाचा नाही का, असा प्रश्न निर्माण होतो.**
>
> – ए. व्ही. शेणॉय, ज्येष्ठ वाहतूक तज्ज्ञ

मुंबईतील मुक्त मार्गांवर आणि ज्या रस्त्यांवर ८० किमीपेक्षा जास्त वेगाने वाहने धावतात, अशा रस्त्यांवर सीटबेल्टसक्ती लागू करावी, असे ज्येष्ठ वाहतूक तज्ज्ञ अशोक दातार यांनी सांगितले.

बसगाड्यांचेदेखील अपघात होतात. त्यामुळे बसमधील सर्व आसनांवर सीटबेल्ट लावावे, असे म्हणावे लागेल. मुळात ज्या नियमांची ज्या ठिकाणी गरज आहे तिथे अंमलबजावणी करावी. सहप्रवाशांना सीटबेल्टसक्तीचा नियम लागू करताना जुन्या गाड्यांसाठी विशिष्ट मुदत द्यावी. नवीन नियमांची अंमलबजावणी करताना यंत्रणांनी सुस्पष्ट आदेश द्यावे. त्यात कोणत्याही त्रुटी असता कामा नये. याची खबरदारी नियमांचे आदेश काढणाऱ्या यंत्रणांनी घ्यावी, अशी अपेक्षा शेणॉय यांनी व्यक्त केली.

# नालासोपाऱ्यातून सराईत चोरट्यास अटक

## मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाला यश

← सकाळ पु.पा.४.

नालासोपारा, ता. ३० (बातमीदार) : मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय हद्दीत घरफोडी, वाहन चोरी, जबरी चोरी करून फरार होणारा सराईत चोरटा नालासोपाऱ्यात अटक करण्यात आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. या चोरट्याकडून सव्वा लाख रुपयांचे पाच मोबाईल आणि एक दुचाकी हस्तगत केली आहे. चोरट्याने घरफोडीचे दोन, जबरी चोरीचे चार आणि वाहनचोरीचा एक अशा सात गुन्ह्यांची कबुली दिली.

नुरउद्दीन ऊर्फ छोटू कमरुद्दीन शेख (२२) असे चोरट्याचे नाव असून हा नालासोपारा पूर्व वाकनपाडा येथील राहणारा आहे. आयुक्तालय परिसरात घरफोडी, वाहनचोरी, जबरी चोरीच्या वाढत्या घटनांवरून वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेवरून मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाचे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, हवालदार शिवाजी पाटील यांना आरोपी चोरीचा माल नालासोपारा पूर्व येथे विकण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार या पथकाने वाकनपाडा येथे सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत पाच मोबाईल, एक दुचाकी असा एक लाख २५ हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल आढळला. त्याच्या चौकशीत त्याने पेल्हार ठाण्यातील पाच आणि वालिव ठाण्यातील दोन अशा सात चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

लोकसत्ता पा.नं.१.

# पोलीस भरतीच्या निकषांमध्ये बदल?

## सर्व समाजघटकांना संधी मिळावी यासाठी प्रयत्न

लोकसत्ता खास प्रतिनिधी



**मुंबई :** करोनाकाळात वयोमर्यादा पूर्ण झालेल्या तरुणांना पुन्हा संधी मिळण्यासाठी नोव्हेंबरमध्ये होणारी पोलीस भरती प्रक्रिया तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आली असली तरी राज्यातील सर्व वयोगटांतील अधिकाधिक तरुणांचा समावेश करण्याच्या उद्देशाने तसेच सर्व जाती व समाजातील तरुणांचा या भरतीत समावेश करण्याच्या उद्देशानेही याबाबत आढावा घेण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेषतः मराठा आरक्षण रद्द झाल्याचा फटका या भरतीला बसू नये, असाही प्रयत्न असल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर भरतीच्या अटी आणि शर्तींमध्ये बदल केला जाण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

पोलीस भरतीला स्थगिती देण्यात आल्याने तरुण वर्गात संतप्त प्रतिक्रिया उमटली. तरुणांनी यावरून समाजमाध्यमांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली. २०२१ मधील पोलीस शिपाई संवर्गातील जाहिरात देण्याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासकीय कारणास्तव स्थगित करण्यात येत असल्याच्या सूचना महासंचालक कार्यालयातील प्रशिक्षण व खास पथके या विभागामार्फत देण्यात आली. तसेच ही जाहिरात देण्याबाबतचे यथावकाश कळविण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलीस विभागांना देण्यात आल्या होत्या. भरतीबाबतची ही जाहिरात १ नोव्हेंबरला काढण्यात येणार होती. राज्यभरात रिक्त असलेल्या पदांसाठी ही भरती प्रक्रिया करण्यात येणार होती. जवळपास १४ हजार ९५६ पदांसाठी ही भरती प्रक्रिया होणार होती. मात्र करोनाकाळात भरती होऊ न शकल्याने वय उलटलेल्या उमेदवारांना संधी मिळावी, हा पोलीसभरतीमागील स्थगितीचा सरकारचा उद्देश असल्याचे बोलले जात आहे. तसचे जातनिहाय भरतीबाबत फेरआढावा घेण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. राज्यातील अधिकाधिक तरुणांना या भरतीत सहभाग घेता यावे, या उद्देशाने अटी-शर्तींमध्ये बदल करण्याबाबत विचार सुरू आहे. त्यासाठी गरज पडल्यास टप्याटप्प्यानेही भरती करण्यात येऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले. याबाबत लवकरच उच्चस्तरीय बैठकीत पुढील निर्णय होण्याची शक्यता आहे. या भरती प्रक्रियेच्या संदर्भात सुधारित तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.

भरती प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती दिल्यामुळे समाजमाध्यमांवर मात्र तरुणांनी नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक दिवसांपासून भरती प्रक्रिया रखडली असताना आता नव्या १४ हजार ९५६ पदांच्या भरतीमुळे तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची मागणी इच्छुकांकडून केली जात आहे.